## परिपत्रक क्रमांक 255

विषय :- शैक्षणिक बाबींवरील राज्याबाहेरील खर्चावरही अंशदान आकारणीत सूट देणेबाबत.

1) सध्याच्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1905 चे कलम 58 (2) नुसार ज्या न्यासाचे उद्देश फक्त शैक्षणिक आहेत, त्यांना अंशदानातून पूर्णपणे सूट देणेत आलेली आहे. त्याचप्रमाणे मुंबई सार्चजनिक विश्वस्त व्यवस्था नियम 1951 मधील नियम 32 (1) नुसार ज्या न्यासांचे उद्देश मिश्र आहेत, अशा न्यासांना शैक्षणिक व वैद्यकीय बाबींवरील खर्चावर अंशंदानातून सूट देणेत येते, परंतू परिपत्रक 57 प्रमाणे जो शैक्षणिक किंवा वैद्यकीय खर्च राज्याबाहेर केलेला आहे, तो माफीसाठी पात्र नसून त्यावर अंशदान आकारणीचे आदेश आहेत. नियम 1951 मध्ये वेळोवेळी बदल/सुधारणा झाल्यामुळे मात्र आता उपरोक्त परिपत्रक व नियम यांत विसंगती निर्माण झाली आहे. तेव्हा त्यांत सुधारणा करुन सुचविणेत येत आहे की,

2) परिपत्रक क्र. 57 दिनांक 22/7/1953 मधील प्रश्न क्र. (दोन) चे स्पष्टीकरणांत (1) ज्या न्यासांचे ट्रि दष्ट हे पूर्णतया निधर्मी शिक्षण देण्याचे असतील व त्यांचे ठोक उत्पन्नातून जितका खर्च राज्याबाहेर किंवा राज्यांतर्गत झाला असेल त्यावर तसेच 2)ज्या न्यासांचे उद्देश मिश्र असतील व त्यांचे ठोक उत्पन्नातून जितका खर्च शैक्षणिक व वैद्यकीय बाबींवर राज्याबाहेर किंवा राज्यांतर्गत झाला असेल त्यांना त्या खर्चावर अंशदानातून सूट देणेत यावी, असा आशय लक्षात घेऊन त्या प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

अ.शं.मेढेकर,
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

दिनांक 25 सप्टेंबर, 1986.